MCAER
कृषि परिषद

महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

ई मेल- edn_mcaer@rediffmail.com दूरध्वनी क्र.-०२०-२५५२८६८८

संकेतस्थळ-www.mcaer.org

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

जा.क्र. मकृप/शिक्षण-१/३३२६/७४४/३९४१ दि.०४/१०/२०२६

वाचा : या कार्यालयाचे परिपत्रक क्र. मकृप/शिक्षण-१/३३२६/७४२/३१३३, दि.३०/०९/२०२६

परिपत्रक

विषय:- पदव्युत्तर प्रवेश प्रक्रिया २०२६-२७
तिसऱ्या प्रवेश फेरीअंतर्गत दुसऱ्या आणि शेवटच्या दिवसाची स्थगित केलेली प्रवेश फेरी कृषी विद्यापीठांच्या मुख्यालयी राबविण्याबाबत दि.३०/०९/२०२६ रोजी निर्गमित करण्यात आलेले परिपत्रक तात्पुरते स्थगित करणेबाबत...

सन २०२६-२७ हया शैक्षणिक वर्षातील पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेंतर्गत दि.२२/०९/२०२६ रोजी कृषी महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे येथे नियोजित तिसऱ्या प्रवेश फेरीच्या दुसऱ्या आणि शेवटच्या दिवसाची प्रवेश प्रक्रिया तात्पुरती स्थगित करण्यात येवून चारही कृषी विद्यापीठांच्या मुख्यालयी दि.०५/१०/२०२६ ते दि.१२/१०/२०२६ रोजी या कालावधीत राबविण्यात येणार असल्याचे दि.३०/०९/२०२६ रोजीचे परिपत्रक निर्गमित करण्यात आले होते.

तथापि, सदर नियोजित प्रवेश फेरी तात्पुरती स्थगित करण्यात येत आहे. याअनुषंगाने पुढील वेळापत्रक लवकरच जाहिर करण्यात येईल. कृपया सर्व प्रवेश इच्छुक उमेदवार व इतर संबंधितांनी याची नोंद घ्यावी.

४.१०

(राहुल महिवाल)
महासंचालक

प्रत कार्यवाहीसाठी:-

१) कुलसचिव / अधिष्ठाता (कृषी), महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहुरी, जि.अहमदनगर / डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी

२) मे. विबास टेक्नोलॉजी, पुणे
यांना सूचित करण्यात येते की, सर्व संबंधितांना अवगत होण्याच्या दृष्टिकोनातून त्यांनी सदरचे परिपत्रक कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावे.

३) **मे. ॲनालिटीका बिझीनेस सोल्युशन्स, पुणे**
यांना सूचित करण्यात येते की, सर्व संबंधितांना अवगत होण्याच्या दृष्टीकोनातुन सदर परिपत्रक संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावे. तसेच सर्व संबंधितांना व महाविद्यालयांना भ्रमणध्वनी / ई-मेल संदेशाद्वारे अवगत करण्यात यावे.

४) सहयोगी अधिष्ठाता तथा अध्यक्ष, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया (तिसरी प्रवेश फेरी), कृषि महाविद्यालय शिवाजीनगर, पुणे यांना माहितीस्तव.